संपादक मंडळ : अपर्णा कुलकर्णी, संजय वडके, शेहेनाज शेख, अनिता गोरे, रोहिणी दिक्षीत, शोभा नायडू, मेधा टेंगशे, उमेश भाग्यवंत, वैशाली गायकवाड, वृंदा वझे
टंकलेखन : संध्या गवळी

आतली चित्रे : जागोरी डायरी १९९८ व २००५, श्री लिपि क्लिप आर्ट, संगीता जाधव

प्रकाशक : आलोचना,
५, पंचाद्री सोसायटी, दुसरा मजला,
५५/ १४-१५-१६, अशोक पथ,
लॉ कॉलेज रोड, पुणे ४११००४
फोन : ०२०-२५४४४१२२

*फक्त खासगी वितरणासाठी*



# चुलीपल्याड...

ऑक्टोबर २०११

## *आमची भूमिका*



चुलीपल्याड...पत्रिका हे आलोचनाच्या संवादिनी कार्यक्रमातील एक पुढचे पाऊल. कार्यकर्त्यांना स्वतःला व्यक्त करण्यासाठी निर्माण केलेले व्यासपीठ. आमच्या पहिल्या अंकाला मिळालेल्या अपूर्व प्रतिसादामुळे आम्हाला या वर्षी दोन अंक काढण्याची प्रेरणा मिळाली. आता चुलीपल्याड पत्रिकेकडे आम्ही केवळ एक प्रयोग म्हणून न पाहता एक प्रक्रिया म्हणून पाहतो. प्रक्रियेत लोकांचा सहभाग जितका जास्त तितकी ती प्रक्रिया जास्त सकस होते असा अनुभव आहे. म्हणूनच या वर्षी संपादन मंडळात प्रत्येक सहभागी संस्थांमधून दोन प्रतिनीधी घेण्यात आले. यामध्ये खेड व मावळ तालुक्यात कार्यरत असणारी दिशा संस्था, मुळशी तालुक्यातील कोळवण खोऱ्यात काम करणारी साधना व्हिलेज, पुणे शहरात खराडी आणि आजुबाजुला विकसीत होणाऱ्या भागात काम करणारी स्त्रीवाणी संस्था आणि गेली अनेक पुणे शहरातील विविध भागातकाम करणारी फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया या चार संस्थांचा सहभाग आहे.

संपादन मंडळातील अनेकांचा संपादनाचा हा पहिलाच अनुभव आहे. म्हणूनच या गटासाठी अंकाच्या निर्मीतीच्या प्रक्रियेतील टप्पे काय असतात या विषयी कार्यशाळा घेण्यात आली. आता प्रत्यक्ष काम करताना अनुभवातुनही आम्ही सारे शिकत आहोत. धडपडत आहोत, पण एक पाऊल पुढे टाकण्याचा प्रयत्न करीत आहोत. हा आमचा नवा प्रयत्न आहे आणि आम्हाला खात्री आहे आपल्याला तो भावेल.

## बिन मोलाचे श्रम

"अग सोन्याला तूच दवाखान्यात ने. तुला काय काम आहे, तू घरीच तर असतेस!"

असे संवाद आपण नेहमीच ऐकतो. रांधा, वाढा, उष्टी काढा, घरातील मोठे छोटे सगळ्यांची देखभाल करा, ही आणि अशी अनेक लहान मोठी घरकामे स्त्रियांच्या पाचवीला पुजलेली असतात. परत हे बिन मोलाचे कष्ट. कारण घरकाम हे स्त्रियांचेच काम मानले जाते. या गृहिणीला इच्छा-आकांशा असतात. तीला काही वेगळे करावेसे वाटते, स्वतःसाठी जगावे वाटते हे सोयीस्करपणे विसरले जाते. गृहिणी घरातच असल्याने तीनेच तडजोड करणे अपेक्षीत असते. घरगुती व्यवसाय किंवा घरच्याच शेतीत काम करणाऱ्या स्त्रियांचे अजुनच हाल. त्यांनी घर संभाळायचेच, पुन्हा घरच्याच व्यवसायात कामाची मजुरी थोडीच मिळते. जरी स्त्रीने नोकरी केली तरी तीला घरातले सगळे आवरुनच जावे लागते. इथे प्रश्न फक्त कष्टाचा किंवा पैशाचा नाही. समाजाच्या मानसिकतेचाही आहे. घरात किंवा समाजात कमवणाऱ्या व्यक्तीला जितका मान असतो तेवढा मान घरासाठी अपार कष्ट करणाऱ्या स्त्रियांना असतो? का तर त्या घरात पैसा आणत नाहीत.

खरेतर आपण स्त्रियांनी आता उलटा विचार करायला हवा. आपण घरात जी प्रत्येक लहान मोठी कामे करतो ते काम नोकर लावून करुन घेतले तर त्याला किती खर्च येईल त्याचा एकदा हिशेबच करून बघुया. ही सर्व कामे करुन आपण घरच्यांचे पैसे वाचवतो. **पैसा वाचवतो म्हणजेच आपण हे पैसे कमवतच असतो हे लक्षात घ्यायला हवे.**



अरे संसार संसार, जसा तवा चुल्यावर,
आधी हाताल चटके, तवा मिळते भाकर.

या बहिणाबाई कवयित्रीच्या गाण्याच्या ओळी ऐकल्या की घरकाम करणारी महिला आणि अविरत करत असलेले काम डोळ्यापुढे येते. ज्या कामातून मोबदला मिळतो, मानधन मिळते समाजात त्यालाच काम करणे असे मानले जाते. त्या कामाचे तास, कामाचा वेग इ.वरून त्याचे वेतन ठरविले जाते.

आजपर्यंत असा कुणी विचार केला की घरामध्ये जी महिला काम करते तिचे काय? गृहिणी ही घरातील सर्वांच्यासाठी सतत काम करीत असते. ती आपलेपणाच्या भावनेने, मायेने सर्वांची देखभाल करते. तिच्या या श्रमांना **काम** समजले जाते का?

घरातील महिलांचे काम सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत सतत चालू असते. तिच्या कामाच्या तासांचा कधी विचारच केला गेला नाही. शेतकरी महिला असेल तर विचारूच नका. सकाळी सर्वांच्या आधी उठून ती शेण-सडा सारवण, जनावरांचे काम आवरते. लांबवरून विहिरीचे पाणी आणते. स्वयंपाक करून मग शेतात कामाला जाते. आपल्या समाजात घर, कुटुंब ही फक्त स्त्रियांचीच जबाबदारी मानली जाते आणि ते सर्व करून नोकरी केली तर अतिउत्तम.



गृहिणीलासुद्धा छोट्या छोट्या इच्छा-आकांक्षा असतात. तीला स्वतःसाठी वेळ हवा असतो. पण याचा विचार केला जात नाही. खरेतर घरातील छोट्या-छोट्या कामांची विभागणी करून सर्वच सदस्यांनी जर हातभार लावला तर ते अधिक सोयीचे ठरते. पण असा विचार बहुतांशी घरांमध्ये केला जात नाही. जेव्हा गृहिणी) आजारी पडते तेव्हा तीचे महत्त्व समजते. घरातील सर्वांनीच घरातील काम वाटुन घेतले तर घरकाम करणाऱ्या स्त्रीला तिच्या छोट्या छोट्या इच्छा-आकांक्षा पुर्ण करता येतील.

मागे मी एकदा एका व्याख्यानाला गेले होते. त्यावेळी तेथे असा प्रश्न विचारला गेला कि, यापैकी **वर्किंग वुमन** (काम करणाऱ्या स्त्रिया) कोण आहेत? त्यावेळी ज्या बाहेर कामाला जातात अशा काही ठराविक महिलांनी अभिमानाने हात वर केला. पण ज्या घरकामच करतात त्यांनी आपले हात खालीच ठेवले. याचा अर्थ त्या काही कामच करत नाही का? आपण महिलाच आपल्या कामाचे मोल जाणत नाही. दुसऱ्यांनाही जाणवू देत नाही. कुणी जर आपल्याला प्रश्न विचारला की काय करता सध्या? पटकन आपण म्हणून जातो काही नाही घरीच असते. एक निराशाजनक सूर त्यामध्ये दिसून येतो. पण घर सांभाळणे हे सुद्धा खूप मोलाचे आणि जबाबदारीचे काम आपण करीत असतो. सामाजिक बांधिलकी जपत आपण कुटुंबाचे आरोग्य सांभाळणे, घर नेटके ठेवणे अशा अनेक भूमिका एका वेळेला पार पाडतो. म्हणूनच घरकाम म्हणजे क्षुल्लक न मानता आपण आपल्या घराच्या **होम मिनिस्टर** आहोत असेच समजले पाहिजे.

– सुनिता फल्ले, दिशा, राजगुरूनगर.



बीन मोलाचे श्रम..पान २ वर पुढे चालू



## स्त्रिया आणि पाणी

येत्या शतकात पाण्यावरून युद्धे होणार असा एक अंदाज तज्ज्ञांनी वर्तवला. कृष्णा नदीच्या पाणी वाटपावरून दोन राज्यातील वाद, मावळमध्ये पवना धरणाच्या पाण्यावरून झालेले आंदोलन ही पुढे होणाऱ्या संघर्षाची नांदीच आहे.

आपण तोड मर्दा तोड ही चाकोरी या गाण्यांमध्ये, धरणीच्या पोटातलं पाणी समान अशी ओळ आहे, पण ते खरं आहे का? खेडेगाव असो की शहर, पाण्यासारख्या अत्यावश्यक सेवेलाही जातीच्या-वर्गाच्या राजकारणानं वेढलयं हे आपल्या लेखांमधून स्पष्ट दिसते. पाण्याचा प्रश्न सगळ्यात जास्त भेडसावतो तो स्त्रियांना! लांबवरून पाणी भरण्यामुळे मागे लागलेली कंबरदुखी, पुरेसे पाणीच मिळत नसल्याने संडास बांधता येत नाहीत, त्यामळे निर्माण होणारे आरोग्याचे व सुरक्षेचे प्रश्न.....अशा अनेक प्रश्नांना व ताणाला स्त्रियांना सातत्याने तोंड द्यावे लागते. घरात पाणी सर्वांनाच लागते. मात्र हा जणुकाही फक्त स्त्रियांचाच प्रश्न आहे असे मानून त्या प्रश्नाकडे घरात, गावात किंवा सरकारी पातळीवरही सोयीस्करपणे कानाडोळा केला जातो. दुसरीकडे जेथे पाणी सहज उपलब्ध असते तेथे ते मोठ्या प्रमाणात वाया जाते. येथेही समाजाची असंवेदनशीलता वारंवार अनुभवायला मिळते. पाणी ही नैसर्गिक संपत्ती आहे. ती जपून वापरायला हवीच. तसेच लिंगभेद-जात-वर्ग-धर्म या पलिकडे जाऊन सर्वांना पुरेसे व सहजपणे पाणी उपलब्ध होणे हा देशातील प्रत्येक बाईमाणसाचा हक्क आहे.

### पान्या तुही जात कंची

गावामध्ये आणि वस्तीमध्ये (दलित वस्ती) सतत पाण्यासाठी, रस्त्यासाठी संघर्ष चालू असतो. दलित वस्ती गावाबाहेर आहे. तेथे जायला कच्ची पायवाट आहे. पावसाळ्यात तर त्या रस्त्यावर दुचाकी गाडीही चालत नाही. दलित लोकांचा त्यांना (गावातील लोकांना) विटाळ होतो, म्हणून गावातील लोक जातीय भेदभाव करून वस्तीला रस्ता देत नाहीत.

पाण्याचेही तेच. काही वर्षांपुर्वी वस्तीतील स्त्रियांना दोन-तीन कि.मी. अंतरावर चालत जाऊन पाणी आणावे लागत असे. कधीतरी गावामध्ये पाणी आणण्यास गेले तर आधी गावातल्या लोकांचे पाणी भरल्याशिवाय आम्हांला पाणी मिळत नसे. त्यामुळे पाण्यासाठी वस्तीला नेहमीच भटकंती सहन करावी लागली. काही वर्षे असा त्रास सहन करत असताना दलित वस्तीत विहीर खोदली. त्याचे पाणी आता वस्तीला मिळू लागले आहे. परंतु उन्हाळ्यामध्ये गावात पाण्याची कमतरता जाणवू लागते. तेव्हा गावातील लोक वस्तीमध्ये पाणी मागायला येतात. तेव्हा "आमच्या लोकांचा तुम्हांला विटाळ होतो मग आमचे पाणी तुम्हांला कसे चालते?" असे विचारल्यावर गावातील लोक शांत बसतात. काहीच बोलत नाही.

हेच लोकं वस्तीत जाण्यासाठी रस्ता देण्या विषयी विचारल्यावर संबंधीत शेतकऱ्यांना विचारा असे म्हणून काखा वर करतात. त्यामुळे आम्हांला रस्ता मिळत नाही. वस्तीमध्ये एकीचा अभाव आहे. त्यामुळे या समस्यांना तोंड देणे खूप हलाखीचे आहे.

लेखक - मुळशी तालुक्यातील पिडीत व्यक्ती

---

बीन मोलाचे श्रम..पान १ वरून पुढे...

## बील मोलाचे श्रम- काही मते

एकंदरीतच समाजात स्त्रियांना नेहमीच दुय्यम स्थान मिळत आले आहे. त्यातही स्त्रियांमध्ये **कमवती** आणि **घरकाम करणारी** असा भेद करून गट-तट पाडले जातात. समाजात घरातल्या कामाला किंवा घरकाम करणाऱ्या स्त्रीला काहीच महत्त्व दिले जात नाही. कमवत्या स्त्रियांची तरी काय? स्त्रिया कितीही शिकल्या, कितीही पुढे गेल्या तरी त्यांना आधी कुटुंबाचाच विचार करावा लागतो नंतर स्वत:चा. नोकरी करणाऱ्या स्त्रियांनाही घरातल्या सर्वांसाठी जेवण बनविल्याशिवाय, घरातली सर्व कामे उरकल्या शिवाय घराबाहेरही पडता येत नाही. एवढी दगदग सहन करूनही तिची जबाबदारी पेलण्यास ती तयार असते. तरीही **स्त्रिया नाजूक असतात** असे म्हटले जाते. खरंच स्त्रिया नाजूक असतात?

- शांता जगताप, एफपीएआय, रामनगर,

जोडोनिया धन उत्तम व्यवहारे! या तुकाराम महाराजांच्या अभंगाप्रमाणे आपण योग्य पध्दतीने धन कमविले पाहिजे. प्रत्येक कामाचे योग्य ते मोल घेतले पाहिजे. मग स्त्रियांना घरकामाचे मोल मिळते का? एखाद्या स्त्रीने तिच्या घरातील कामाची किंमत घेतल्याचे ऐकले आहे का? मी तरी नाही. पैशाला महत्त्व आल्याने हल्लीच्या जमान्यात घरकाम करणाऱ्या महिलेची स्थिती वेगळीच झाली आहे. स्त्रीच्या घरकामाचे काहीच मोल वाटत नाही. एखादा पुरूष किंवा स्त्री नोकरी करून महिन्याचा पगार घरी आणते ते आपल्याला दिसते. पण त्याहूनही कणभर श्रेष्ठच असलेले घरकामाचे मोल मात्र आपल्याला दिसत नाही. कारण त्याला पाहायला एक वेगळीच दृष्टी लागते. अन् ती जोपासण्याची गरज आहे.

- अश्विनी घनवत, दिशा, चास.

**बैल बाईकला नाई धस,**
**पाऊस तिसऱ्या नाईकाला.**

ही म्हण कोळवण मधील यमुना धिडे यांनी पाठवली. याचा अर्थ बैल, बाई आणि पाऊस या तिघांनाही काम केले तरी नाव मिळत नाही. काही झालं तरी समाज त्यांना नावंच ठेवतो.

### पान्या तुही जात कंची

खराडी हे पुण्याचे नव्याने विकसीत होणारे क्षेत्र आहे. येथे मोठ्या कंपन्या, मोठी हॉटेल उभी राहिली आहेत. नव्या नव्या बिल्डींग होत आहेत. मात्र या विकसीत भागात आजही काही भागात पाण्यासारखी किमान गरजेची गोष्ट पुरवली जात नाही. येथील पाणीप्रश्नाची माहिती घेण्यासाठी खराडीतील सुर्यप्रकाशनगर भागात **पाणी आणि महिला** या विषयावर गट चर्चा घेतली होती. ही वस्ती १९७२ पासून वसली आहे व बहुतेक सर्व लोकं वडारी समाजाचे आहेत. पाणी पुरवठा नसल्याने स्त्रियांना व तेथील लोकांना किती अडचणींना तोंड द्यावे लागते आहे त्याचा हा वृतांत.

चर्चेत प्रथम वस्तीतल्या भिमाबाईंनी बोलण्यास सुरूवात केली. त्या म्हणाल्या, "या भागात पाणी नसल्यामुळे खुप अडचणी होतात. अक्षरश: संडासला जाण्यासाठी पाणी नसते तर दगड वापरावे लागतात." यावर सगळ्या हसल्या व आपल्या अडचणी मोकळेपणाने मांडू लागल्या.

नागूबाई म्हणाल्या की पाणी नसल्याने संडासे बांधता येत नाही, उघड्यावर संडासला जावे लागते. त्यांनी घडलेला एक प्रसंग सांगितला. त्यांच्या भावाची सून एकदा संडासला गेली होती. त्यावेळी एक मुलगा तिचा पाठलाग करत तिच्या मागे गेला. ती पुर्णपणे घाबरली. तेव्हाच गंगुबाई कामावरून त्याच रस्त्याने घरी येत होत्या. मग गंगुबाईना पाहून त्या मुलाने पळ काढला. यावरून या भागातील मुली, महिला यांच्या सुरक्षेची अवस्था आपल्याला पाहता येईल. एक महिला म्हणाली, "आमच्या परिस्थितीचा आणि अडचणींचा समाजातील इतर लोक गैरफायदा घेतात. इथे राहणाऱ्या महिलांना त्यांची इज्जत उघड्यावर मांडल्यासारखी वाटते."

पाण्याचा टँकर महिन्यातून दोन वेळा येतो त्यामुळे पाणी पुरत नाही असे बायका म्हणाल्या. पाणी आणण्यासाठी वस्तीसमोर असणारा मोठा हायवे-रोड ओलांडून जावे लागते. कोठून कशी गाडी येईल हे सांगता येत नाही. या भागात पाणी भरण्यासाठी सतत भांडणे होतात.

पाण्याचा प्रश्न एव्हढा मोठा आहे की कधी-कधी स्वयंपाक करायला पाणी नसते व उपाशीच रहावे लागते. पाणी साठवून ठेवण्यासाठी वस्तीतील लोकांकडे भांडी नाहीत. ज्या ठिकाणी पाणीसाठा करतात त्यात माशा, उंदीर पडतात. पण दुसरा पर्यायच नसल्याने नाईलाजाने तेच पाणी वापरावे लागते. वस्तीत महानगर पालिकेचे लोक येत नाहीत. कोणीही इथल्या परिस्थितीची दाद घेत नाही. आमदारांना भेटल्यानंतर १५ दिवस पाणी पुरवठा होतो त्यानंतर पुन्हा बंद होतो. गंगुबाई सांगत होत्या, त्यांची मुलगी बाळंत झाली तेव्हा वस्तीत सर्वांकडे पाणी मागितले पण पाणी मिळाले नाही. मुलीचे बाळंतपणाचे कपडे त्यांनी तीन दिवसांनी धुतले. पाणी नसल्याने वस्तीतील लोकं दोन-दोन दिवसांनी आंघोळ करतात.

१९७२ पासून वस्ती असूनही लोकांमध्ये एकी नसल्याने हा प्रश्न सुटत नाही असे स्त्रियांना वाटते. पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी वस्तीतील पुरूषवर्ग सहकार्य करत नाहीत आणि महिलावर्ग एकत्र नाही. लोक एकत्र येत नसल्याने वस्ती कोणावर दबाव आणू शकत नाही असेही महिला म्हणाल्या. इथेच शेजारी नव्याने झालेल्या अपार्टमेंटमध्ये २४ तास पाणी पुरवठा होतो. काही मोठ्या सोसायट्यांमध्ये तर पोहोण्याचे तलावही आहेत. मात्र वस्तीत पिण्याच्या पाण्याचा पुरवठाही होत नसल्याचे दु:ख स्त्रियांनी मांडले.

लेखन - स्त्रीवाणी टीम



चित्र - सुनीता जाधव, साधना व्हिलेज

*स्त्रिया आणि पाणी...काही अनुभव -पान ४ वर.*

# माझे जीवन, माझी कहाणी



स्त्री चळवळीने घरगुती हिंसा, लैंगिक छळ....हे सर्व स्त्रियांचे खासगी प्रश्न नसून ते राजकीय प्रश्न असल्याचे सांगितले. स्त्रियांच्या या परिस्थितीला जबाबदार असणाऱ्या समाज व्यवस्थेला आव्हान केले. त्यातून अनेक स्त्रियांना आपले प्रश्न न लाजता, निर्भीडपणे मांडण्याचे बळ मिळाले. चुलीपल्याडच्या दुसऱ्या अंकात आलेल्या अनेक जीवन कहाण्या हा स्त्री चळवळीच्या अनेक वर्षांच्या प्रयत्नांचा परिपाकच होय. या अंकासाठी पाठवलेल्या सर्वच कहाण्या फार भावस्पर्शी होत्या. मात्र जागेच्या अभावी त्यातील काही मोजक्या कहाण्याच या अंकात देण्यात आल्या आहे. या कहाण्या फक्त दुःखाच्या नसून स्त्रियांच्या लढ्याच्या आहेत. अत्यंत खडतर परिस्थितीतही आलेल्या प्रसंगाला सामोरे जाण्याचे त्यांचे धाडस फार कौतुकास्पद आहे. काहींनी स्वतःसाठी मार्ग शोधताना सोबत आपल्यासारख्या चारजणींना बरोबर घेण्याचा प्रयत्न केला आहे. संस्थेच्या पाठबळामुळे अनेकींची आयुष्याला भिडण्याची उमेद वाढली आहे. या कहाण्यांमधून आपल्याला जगण्याची प्रेरणा मिळते.

## ही माझी कहाणी

माझ्या आईच्या गर्भातून मी बाहेर आले नि आई सोडली तर सर्वांचीच निराशा झाली. माझ्या मोठ्या बहीणच्या पाठीवर सात वर्षांनी माझा जन्म झाला म्हणून असेल कदाचित. बालपण अनुभवल. तारुण्यात पदार्पण करते ना करते तोच कुमारीचे रुपांतर सौभाग्यवतीमध्ये झालं. तेव्हापासून माझी जीवन कहाणी सुरु झाली. वडील आणि चुलते यांचे म्हणणे मुलगी दिली तिथं मेली. म्हणजे मी समजून घेतले की आपणच आपलं लढायचं आणि जगायचं.

नवखेपणामुळं वर्षभरात जीवन तसे बऱ्यापैकी चालले होते. पहिला पाळणा हलला नि मुलीचा जन्म झाला. पहिलीच खेप असल्यामुळे आनंदी आनंद होता. दुसरा पाळणा हलला तोही मुलीचा. मग मात्र मला सोडून कोणाला आनंद झाला नाही. तेव्हा मात्र मला माझा जन्म झाल्यावर माझ्या आईची परिस्थिति कशी झाली असेल हे जाणवले. मी ऑपरेशन करण्याचा निर्णय घेतला. माझ्या मिस्टरांचा निर्णयही तोच होता. पण आई-वडील, सासू सासरे, नणंद, जाऊ, दिर, शेजारी सर्वांचा विचार नाही असा होता. विचार काय धमकीच म्हणा! तेव्हा मी एकटीच पडले. माझं पारड हलकं असल्याने नाईलाजास्तव मला त्यांचं ऐकाव लागलं. मुलींची देखभाल, संगोपन करत दिवस चालले. तिसऱ्याची चाहूल लागली मग मात्र मला चैन पडेना. जर तिसरी मुलगी झाली तर माझं ऑपरेशन? सासू-सासरे, नणंदा काय म्हणतील? आई लक्ष घालेल का? वडील तर म्हणतील दिली तिथं मेली! लिंग तपासनी तर कायद्याने गुन्हा शिवाय पैसेही भरपूर लागतात. काय करावे ते सुचेना. पण म्हणं आहे ना एक देव तारी त्याला कोण मारी. मनान निश्चय केला होता की आता ऑपरेशन करायचंच. नणंदेचे मात्र वरचे वर फोन यायचे. मुली झाल्यावर काळजी करु नकोस. आम्ही प्रत्येक जण एकेक घेऊ. पण मला काळजी ती माझ्या शरीराची. मुलाची वाट पाहता पाहता माझ्या शरीराची झीज कशी भरुन निघेल? शिवाय एकत्र कुटुंब असल्याने आराम करायला वेळ नाही ना कसला विरंगुळा!

अखेर बाळंतपनाचा दिवस, काय तो क्षण आला. बाळंतपण झालं. कानावर शब्द आला तुला मुलगा झाला नि भांड्यात जीव पडला. कारण आनंद मुलगा झाला म्हणून नव्हता तर ऑपरेशनला कोणी आता आडवे येणार नाही म्हणून! ताडकन उठूनच बसले नी विचारलं, "सिस्टर ऑपरेशन कधी आहे?" पुढे ऑपरेशन झाले.

माझा मुलगा पाच महिन्याचा झाला नी मी एफ पी ए आय मध्ये फिल्ड वर्कर म्हणून रुजु झाले. संस्थेत वेगवेगळी माहिती मिळाल्याने समोरच्या माणसाच्या डोळ्यात डोळे घालून बोलायची हिम्मत आली. नाही एखादी गोष्ट पटली तर विरोध करायची ताकद आली. इतरांच्या चुका सगळेच काढतात पण इतरांचे गुण विशेष टिपण्याची नजर केवळ संस्थेने दिली. अगोदर मी एक भित्री माऊ होते नंतरची मी एक यशस्वी कार्यकर्ती आहे.

– पंचशीला कांबळे, एफ पी ए आय, बापोडी

## माझी जीवन कहाणी

मी चौथ्या इयत्तेत असताना माझ्या वडिलांना हातभार लागावा म्हणून शाळा सोडली आणि वयाच्या १०व्या वर्षापासून घरकाम करु लागले. त्यावेळी मला आठ रुपये पगार मिळत होता. चौदाव्या वर्षी माझे लग्न झाले. मला सातारा जिल्ह्यातील शिरवळ तालुक्यातील राजापूर येथे दिले. १९८८ साली मला मुलगा झाला. मुलाच्या जन्माच्या वेळेला माझे पती कामाला म्हणून गेले ते बेपत्ताच झाले. सासूने घराबाहेर काढले.

मुलगा वयाने लहान असल्याने मी भावाच्या घरी येरवड्यात नागपूर चाळ येथे आले. पुन्हा घरकामाला सुरुवात केली. मला त्यावेळेस रु. ४० महिन्याला पगार होता. तीन चार घरी काम करीत होते. मी मुलाला संभाळून माझे घर चालवीत होते. त्यावेळी माझ्याकडून ४-४तास काम करून घेत. सुट्टी नसे ना बोनस. तरीही मी काम करीत होते कारण मजबूरी होती. १९९६ मध्ये येरवड्यातील त्रिदल नगर येथे घरकाम करणाऱ्या चार पाच बायका गोळा झालो. आम्ही निर्णय घेऊन १०० रुपयाची पगारवाढ केली. मग माझ्या मुलाला पहिलीला शाळेत दाखल केलं. माझ्या कामात मी वाढ केली. ज्या ठिकाणी मी काम करत होते ते मला घरातल्या सारखे वागवीत. नंतर मी खराडी, संजय पार्क येथे स्वतंत्रपणे एक रुम भाड्याने घेतली. मी दुसऱ्या नवीन ठिकाणी कामाला लागले. स्वयंपाकाची कामे करायला सुरवात केली. एकदा एके घरातील लोकांनी माझ्या तोंडावर गरम डाळ फेकली. मी ते काम रडत रडत सोडून दिले. त्यावेळेस मला कोणी मदतीस आले नाही. अशाच घटना दोन तीन वेळा झाल्या. पण आमच्यात एकी नसल्यानं काही करता आलं नाही.

पुढे २००६ हे साली आम्ही १०-१५ बायांनी लक्ष्मीमाता मंदिरात जमलो. दर महिन्याला मिटींग घ्यायचे ठरले. बघता बघता वर्षात ५०-६० जणी एकत्र आलो. आमच्या घरकामागारांमध्ये एक प्रकारची एकी निर्माण झाली. मग आम्ही स्त्रीवाणी संस्थेत सामील झालो. आम्हांला स्त्रीवाणी संस्था प्रोत्साहन देते, चांगला सल्ला देते. आम्ही संस्थेत गेल्यापासून ज्यांच्याकडे आम्ही कामाला तो ते लोकं आमच्याकडे आदराने पाहू लागले. महिन्यातून चार सुट्या, बोनसही मिळू लागला. आम्ही आजारी असलो तरी ते आम्हांला पैसे देतात, सुट्टी देतात किंवा औषध देतात. आमच्या प्रत्येक महिन्यातून दोनदा मिटींग होतात. त्यात प्रत्येक बाईला कोणता प्रॉब्लेम असेल तर सोडवण्याचा प्रयत्न केला जातो. स्त्रीवाणी संस्था आमचा विचार करते. सरकारलाही आमच्या समस्या, अडचणी सांगते.

– माया कडाळे, स्त्रीवाणी

## मी आणि आई

मी जन्माला येण्याअगोदर माझी आई वेडी झाली होती. मला कधी आईचे प्रेम जास्त मिळाले नाही. मी जन्मल्यावर ती मला मारून टाकायचा प्रयत्न करायची. कधी कोयता मारायला घ्यायची तर कधी टिपाडाच्या मध्ये घालायची तर कधी भाताच्या गंजीत. मला प्रत्येक वेळी घरचे किंवा शेजारचे लोक वाचवीत. आईची व मुलांची एकमेकांवरची माया, प्रेम काय असते ते मला कधी कळलेच नाही. आम्हाला चुलतीने सांभाळले नी आईचे प्रेमही देते.

माझी आई फक्त सहा महिने घरी आणि सहा महिने हॉस्पिटलमध्ये असे. सुरुवातीला ती जेव्हा बरी होऊन घरी येई तेव्हा मला एखादी अनोळखी व्यक्ती माझ्या आयुष्यात येते आहे असे वाटे. ही सगळी घटना मी चौथी किंवा पाचवीला असताना घडलेली आहे. तेव्हा माझी आई नीट होऊन शेवटची घरी आली. तेव्हा मी थोडीशी कळीत झाले होते. मला अजूनही आठवते की माझी आई मेन्टल हॉस्पिटलवरून यायची तेव्हा मला जवळ घेण्याचा प्रयत्न करायची. परंतु मी जात नसे. मात्र पैसे लागले की आईकडे पळत जायचे. आमचे नाते पैशापुरते होते का? ह्या चे उत्तर आता मला उलघडते. कारण आई आणि मुलाचं नातं कधी न संपणारे अतूट बंधन आहे.

माझी आई पुन्हा एकदा वेडी झाली ती नीट न होण्यासाठी. माझे वडील खूप त्रासलेले होते. आईच्या वेडेपणाला तब्बल ६-७ वेळा नीट करून आणले होते. आई शेवटी अंथरुणावर पडली. तिचे हातपाय काम करेनासे झाले. मी कधी आईजवळ गेलेच नाही. माझी बहीण आईच्या आजारपणात तिला जेवायला द्यायची. आई २००३ मध्ये वारली. तेव्हा मी नुकतीच सहावीला गेले होते. तो माझ्या शाळेचा पहिला दिवस. आई वारली तरी मला काहीच वाटले नाही. मला साधे रडायलाही आले नाही, कारण माझी आई माझ्याबरोबर असून नसल्या सारखीच. माझ्या मैत्रिणी मला म्हणायच्या तुझी आई वारली तर तुला काहीच कसे वाटले नाही? त्यावेळी मी त्यांना म्हणायची की मला काय माहीत? पण मला आत्ता चांगले कळते की आपल्या आईचे आपल्या जीवनात किती स्थान आहे. त्यावेळी मला काही वाटले नाही पण आत्ता मला माझ्या आईची खूप आठवण येते.



आता मी मोठी झाले. माझ्या वडीलांची मला कधीच भिती वाटली नाही. मी त्यांना बिनधोक एखादी गोष्ट सांगू शकते. अन् आई नसली तरी माझी काळजी घ्यायला माझी चुलती व चुलता आणि माझे वडील समर्थ आहेत.

– रेश्मा फाले, साधना व्हिलेज

## पाऊस गीत

पाऊस राजाचा काळा कमानीत घोडा
एका खिनंमधी त्यानं प्रिथीला घातला वेढा...
पाऊस पान्याचा आभाळात झाला गाळ
आता माझ्या बाळा कुणब्या शेवटावा फाळ...
पाऊस राजानी फळी धरली दुरूनी
आता माझा बाळ कुणबी निघाला पेरूनी!
पड रे पाऊसा दुबळ्याचा भाजीपाला
असा समरत बोले माझ्या गल्याचा नास झाला...

– यमुना धिडे, साधना व्हिलेज, कोळवण

*हे कोळवण खोऱ्यातील लोकगीत आहे. यातील काही शब्दांचे अर्थ - खिनं म्हणजे क्षण, प्रिथीला म्हणजे पृथ्वीला व गल्याचा म्हणजे घशाचा*

# माझे जीवन, माझी कहाणी



## कथा माझी

माझं लग्न १३व्यावर्षी झाले. लग्नानंतर आलेगाव (शिरूर तालुका) ह्या ठिकाणी नांदत होते. लग्नानंतर दोन वर्षात मुलगा झाला पण अपंग होता. ह्या कारणाने घरातील लोक म्हणजे सासू, सासरे शिव्यागाळ करत. रोज संध्याकाळी नवरा मारत असे. एकदा माझे वडील मला भेटायला आले. त्यांनी हे सर्व पाहीले. त्यांनी नवऱ्याला व सासू सासऱ्यांना समजून सांगण्याचा प्रयत्न केला. पण काही फायदा नव्हता. तुमची मुलगी मला लागत नाही तुम्ही घेऊन जा असे नवऱ्याने सांगीतले. वडील म्हणाले सासरीही कष्ट करून खायचे आणि माहेरीही कष्ट करून खायच. फरक काय नाही, फक्त रोजचा मार कमी होईल. मी गरीब आहे पण ह्या अवस्थेत तुला ठेवता येत नाही. चल! तू आमच्या ताटात जड होणार नाही. तेव्हा पासून मी त्या घरातून निघाले नी परत त्या घराचे तोंड पाहिले नाही. वडीलांसोबत लोहगावला आले. मला शेतीकाम येत असल्याने माहेरीही मी शेतीकाम करू लागले. शेतात काम जास्त व पैसे कमी असे. आमच्या गावात आसपासच्या मोठ्या घरात धुण्याभांड्याचे काम इतर महिला करत. मीही घरकामास जाऊ लागले. महिन्याला रु. २५० पगार होता. त्यात घरातील सर्व काम स्वयंपाक, धुणी भांडी, साफ सफाई इतर कामे करावी लागत. तोवर मी दुसऱ्या भाड्याच्या घरात राहु लागले. त्यामुळे इतक्या कमी पैशात घर भागत नसे. कमी पैशात सर्वच पहायला लागत असे. कामाच्या ठिकाणीही काही सांगता येत नसे पगार वाढ्वून द्या वगैरे.. जर काही बोलले तर कामावरून काढून टाकण्याची भिती होती. म्हणून मुकाट्याने सर्व काम करत असे. कधी जेवण मिळे, कधी नाही. उरलेले जेवण कामावरून मिळत असे त्यावरच आमची रात्र निघत असे. असे करून मी माझ्या मुलाचे शिक्षण पूर्ण केले. तो १५वीपर्यंत शिकला. तो दोन्ही पायांनी अपंग आहे. त्यामुळे त्यानं खूप शिकाव म्हणजे त्याला चांगली नोकरी लागलं असं मला वाटतं. आता तो कामाच्या शोधात आहे. मी अजूनही घरकाम करते. आणखी दोन ठिकाणी कामाला जाते. काम करताना हात, पाय, पाठ खूप दुखत असते तरी मी कामाला जाते. मला फक्त इतकी आशा आहे, माझ्या मुलाला चांगली नोकरी लागावी. मग मी स्वत:चे घर विकत घेईल आणि मग माझे कष्ट तेव्हा संपतील.

– सुभद्रा गुंजाळ, स्त्रीवाणी



## माझी आत्मकहाणी

वयात आल्यावर माझं लग्न झालं. लग्न झाल्यानंतर मा व नवरा आमच्या शेतीत काम करायचो व कधी शेतीमजूरीला जयचो. दोन वर्षांनी एक मुलगी झाली. मुलगी झाल्यानंतर मग नवऱ्याला दारुचे व गांज्याचे व्यसन सुरु केले. पुढे मुलगा झाला नी भांडणं जास्त वाढू लागली. पुढे तो त्याच्या घरच्या माणसांना मारहाण करु लागला. मग त्यानंतर सर्वांनी वायले घेतले. (वेगळे झाले.) पण तरीही नवरा काम करत नव्हता. तेथून पुढे दारुचे व जुगाराचेही व्यसन जास्त सुरु झाली.

त्यानंतर चार माणसांच पोट भरणे मुश्कील होत. मग माझी मुले आणि मी अशी तिघेजण माहेरी आलो. एक वर्ष राहिलो. नंतर चार माणसांनी मध्यस्थी केल्यानं आम्ही तीघे पुन्हा आमच्या गावाला (सासरी) गेलो. दारु प्यायला पैसे नसल्यामुळे नवऱ्यानं घरातल्या सगळ्या वस्तू विकून टाकल्या. माझे मंगलसुत्रही विकलं. मी मजुरी करत असताना त्याचे जे पैसे येत असत ते हिसकावून घेण्याचा प्रयत्न केला. ते दिले नाही म्हणून मुलांवर आणि माझ्यावर रॉकेल वतले. तो काडीपेटी बॉक्स शोधत होत. तोवर आम्ही पळून बाहेर गेलो. कुणाच्या घरात जाऊन त्यांना त्रास होऊ नये म्हणून आम्ही रात्रभर संडासमध्ये राहिलो. तो रात्रभर कुऱ्हाड घेऊन हिंडत होता. मग त्याला चार माणसांनी समजून सांगितले. मग आम्ही दोन चार महिने व्यवस्थित राहिलो.

पुढे नवऱ्याने शेजाऱ्यांच्या घरात चोरी केली. त्या माणसांनी त्यांना दोन वर्ष जेलमध्ये टाकलं. मग ते शेजारी, सासू सासरे आणि दिर मला त्रास देऊ लागले म्हणून मी पुन्हा माहेरी गेले. तिथेच मग मजुरी करुन पोट भरु लागले. त्यानंतर दोन वर्षांनी जेलमधून सुटुन नवरा आमच्याकडे आला तेव्हा त्यांची तब्येत खूप डाऊन होती. त्यांना असाध्य आजार झाला होता. मग आम्ही माहेरीच वेगळं राहिलो. खर्चासाठी व आजार बरा करण्यासाठी आमच्या वाट्याची निम्मी शेती विकून टाकली. आजार बरा होणार नाही हे कळल्यावर त्यांनी पुन्हा व्यसन सुरु केले अन् दारुच्या नशेत जीव दिला. मग मी व मुलं एक वर्ष माहेरीच राहिलो. वर्षांनंतर मुलला माहेरीच ठेवली व मुलगा आणि मी आमच्या गावाला आलो. पोट कसं भरायचं म्हणून मी एक युक्ती शोधली. जुने ब्लाऊज उसवून कागदावर पॅटर्न तयार केले व त्यावरुन ब्लाऊज शिवायला सुरु केले. तसंच वाट्याच्या उरलेल्या अर्धा एकरावर शेती सुरु केली. गावातल्या बऱ्याचशा बायका माझ्याकडेच ब्लाउज शिवायला देतात. मग बचत असावी म्हणून मी बचतगट सुरु केला. पुढे दिशा संस्थेच्या संपर्कात आले. संस्थेने मला फॅशनचे ब्लाऊज शिकायला कोर्सला पाठवले व मदत केली. अशा प्रकारे मी हळु हळु एक एक पाऊल पुढे जाण्याचा प्रयत्न करते आहे.

– मिरा गोरडे, दिशा, गोसासी

---

# स्त्रिया आणि पाणी... काही अनुभव

मी नागपूरची. आमच्या ऐरियात (वस्तीत) दोन ते तीन नळ कोंढाळे होते. पाणी सकाळी पहाटे चार वाजता यायचे. माझी आई व मी सकाळी चार वाजता उठून पाणी भरायचो कारण नंतर बरेच बायकांचे नंबर पाण्यासाठी राहायचे व त्यांच्यात खूप भांडणे व्हायची. त्या भांडणापेक्षा कंटाळा आला तरी आम्ही लवकर सकाळी (पहाटे) उठून पाणी भरायचो. पुढे लग्न झाल्यावर मी पुण्यात आले. किष्किंधा नगरमध्ये आम्ही खाली वस्तीत राहत होतो. तेथे पाण्याचा प्रश्न नव्हता. परंतु डोंगरावर बरीच घरे होती. तिथल्या महिला दोन कळशा-दोन हंडे एकावरती एक घेवून खालून वर डोंगरावर त्या पाणी घेवून जायच्या. तेव्हा वाटायचे किती त्रास होत असेल या बायकांना! डोंगर साधे चालवत जात नाही तिथे या बायका चार भांडी ती पण पाण्यानी भरलेली डोंगरावर नेतात. बायकांना पाण्यासाठी किती त्रास सहन करावा लागतो.

– ज्योती देशकर, एफ पी ए आय.
वारजे-माळवाडी पुणे.



३० वर्षे लग्नाला झाली. डोक्यावरील हंडा चुकला नाही. एक तास पाणी भरायला आणि ३ तास नदीला जाऊन कपडे धुवायला लागतात. संपुर्ण गावाला एकाच ठिकाणचे पाणी आहे. टाकीवर चढून पाणी शेंदून काढावे लागते, त्यामुळे पाठ व पाय दुखतात.

पाणी काढताना पाय घसरून टाकीत पडले तर वर निघायची पंचायत. गावाने सरकारी योजनेसाठी प्रयत्न केले. नळयोजनेसाठी घरटी ५०० रू. भरले, पण अजुनी थंड. मुळशी धरणाचे पाणी टाकीत येते, पण दारात पाणी कधी येणार? आम्ही म्हातारे झाल्यावर येईल का? आता माझी पाठ दुखते म्हणून पाणी आणताना जीव रडकुंडीला येतो. रोज पाच-सहा माणसांसाठी दहा खेपा पाणी आणणे म्हणजे शिक्षा वाटते. पाणी भरण्यातच दिवस जातात की काय कोण जाणे! आयुष्य पाणी भरण्यातच जाणार का?

– नंदाबाई यादव, साधना व्हिलेज, दखणे.

माझा जन्म पुण्यातच झाला होता. पुण्यात पाण्याची काळजीच नव्हती. कारण पुण्यात बहुतेक घरी नळ व २४ तास पाणी असते. मला सपनात पण वाटलं नव्हत की माझ्यावर लांबवर चालत जाऊन पाणी भरण्याची वेळ येईल.

मला गावाला दिली. गावात चार घर मिळून एक नळ आहे. काहींच्या घरात नळ आहेत तर काहींच्या घरासमोर आहेत. तेथे सुद्धा लाईटचा प्रॉब्लेम आहे. लाईट नसली तर पाणीच नाही. लाईट रोज जाते, कधी २ तास तर कधी १२ तास जाते तर कधी २ दिवस येतच नाही. मग २ ते ३ कि.मी. चालत गेल्यावर ओढ्यावर, धरणावर पाणी भेटते. ओढ्यावर जाताना दगड, माती, काटे, झाडे असल्यानं जायला वाट नसते. पहिल्यांदा गेल्यावर ओढ्यावर जाताना मी पडता-पडता वाचले. पण पाण्याशिवाय कामे कशी होणार? त्यामुळे लांब असू की जवळ जायला तर लागणार. पाण्यातच सगळा वेळ जातो. त्यामुळे पुढची कामे राहतात. पाण्यामुळे कुठे जाता येत नाही. म्हणून लोकांनी पाणी वाया घालू नये आवश्यक तेव्हढाच पाण्याचा वापर करावा असे वाटते. कारण थेंबे थेंबे तळे साचे.

– वैशाली साठे, साधना व्हिलेज, हाडशी,

***या अंकातील लेखाची निवड प्रक्रिया***

*अंकाचे संपादन या विषयी संपादन मंडळाचे एक शिबीर घेण्यात आले. त्यात सर्वांनी मिळून लेख कसे निवडायचे याचे काही निर्देशांक काढले. प्रामुख्याने त्या निकषांच्या आधारे लेखांची निवड झाली. ही निवड प्रक्रिया दोन पातळीवर झाली. प्रथम प्रत्येक संस्थेच्या पातळीवर. हे करताना संस्थेतील काही कार्यकर्ते, संपादकीय मंडळात असलेले संस्थेचे व आलोचनाचे प्रतिनिधी यांनी प्रत्येक लेख वाचून त्यातील लेख निवडले. ह्या निवडलेल्या लेखांचे पुन्हा एकदा पूर्ण संपादन मंडळासमोर वाचन झाले व त्यातून अंतीम लेखांची निवड झाली. यावेळेस नव्या लोकांना संधी देण्याचा प्रयत्न केला आहे.*

*लेखन ही कला आणि प्रक्रिया आहे. स्वत:शी संवाद साधायचे हे प्रभावी माध्यम आहे. त्यामुळे या अंकात लेख आला नाही तरी कोणी कृपया हिरमुसले होऊ नये. ही लेखन प्रक्रिया अविरत चालू रहावी हीच आशा.*

*या अंकात ज्या सर्वांनी लिखाण केले त्या सर्वांचे मनापासून आभार.*

